# संपादकीय

## नाशिकची सुनियोजित ग्रंथयात्रा

नाशिकची ग्रंथयात्रा हा एक सुखद अनुभव होता; २ ऑक्टोबर ते ११ ऑक्टोबर १९९८ या दहा दिवसांच्या अवधीत हायस्कूल ग्राऊंडचे रूपांतर ग्रंथनगरीत झाले होते आणि हजारो ग्रंथप्रेमी स्त्रीपुरुषांची आणि बालबालिकांची कुंभमेळ्याला व्हावी तशी तेथे वर्दळ होती. नाशिक शहर सांस्कृतिकदृष्ट्या आता महाराष्ट्रात आपली वेगळी प्रतिमा उमटवू पाहत आहे. ज्ञानपीठ मानकरी कविवर्य कुसुमाग्रजांच्या संजीवक स्पर्शाने, अग्रगण्य नाटककार वसंतराव कानेटकर यांच्या वास्तव्याने या शहराला साहित्यतीर्थाचे महात्म्यही प्राप्त झाले आहे. सार्वजनिक वाचनालय यासारख्या वाचनालयातर्फे विविध उपक्रमांना समर्थ व्यासपीठ लाभले आहे. या वाचनालयातर्फे निघणाऱ्या 'सावाना' या दिवाळी अंकामुळे या परिसरातील साहित्यिकांची दिवाळीही वेगळ्याच थाटात साजरी होते. 'संवाद'च्या वार्षिक मेळाव्याच्या निमित्ताने व नैमित्तिक बैठकांमुळे नव्याजुन्या लेखककवींची घसट वाढते. आपल्या साहित्याची गुणवत्ता कसावर घासून पुसून पाहता येते. गावकरी, देशदूत, सकाळ वगैरे दैनिकांच्या माध्यमातूनही येथील नव्याजुन्या साहित्यकारांना स्वागतशील वातावरणात फुलण्याचा अवसर मिळतो. उत्तम दर्जाच्या ग्रंथदालनांचाही संसार त्यामुळे येथे भरभराटीला येत आहे. मुक्त विद्यापीठ, एचपीटी व इतर महाविद्यालये, या सर्वांमुळे एक प्रकारची बौद्धिक, वैचारिक व वाङ्मयीन स्पर्धाही येथे दिसून येते. राजकारणात राहूनही वाङ्मयप्रेम व रसिकता जोपासणारे पुढारी-कार्यकर्ते येथे आहेत; आणि संगीत-नाट्यक्षेत्रातले मुरब्बी जाणकारही येथे आहेत. साहजिकच नाशिक महापालिकेने येथे ग्रंथयात्रेचे आयोजन करण्यात पुढाकार घ्यावा हे स्वाभाविक व स्वागतार्ह आहे. या ग्रंथयात्रेचे आयोजन अत्यंत शिस्तबद्ध आणि आखीवरेखीव होते; ग्रंथप्रदर्शनात ७६ प्रकाशकांचे १४० स्टॉल होते; त्या स्टॉलची व्यवस्था उत्तम होती. प्रकाशकांच्या टेबलखुर्च्यांची, वीजपुरवठ्याची व्यवस्थाही आवश्यकतेप्रमाणे तातडीने भागविण्यात येत होती. पहिल्या दिवशी उदघाटनाच्या वेळी पाऊस आल्याने ग्रंथप्रदर्शनाच्या मैदानावर चिखल होऊ लागला होता. परंतु लगेच दहापंधरा ट्रक खडी टाकून त्यावरून रोलर फिरवून सर्वत्र चकाचक करण्याची तत्परता महापालिकेने दाखवली. कलकत्ता येथील ग्रंथजत्रा ही भारतातच नव्हे तर जगभर नावाजली जाते. परंतु ती देखील प्रकाशक संघटनेतर्फे भरते. महापालिकेतर्फे ग्रंथयात्रेचे आयोजन होणे हा प्रकार



विरळाच! नाशिक महापालिकेने या ग्रंथयात्रेचे आयोजन करून पुणे-मुंबई-नागपूर-कोल्हापूर इत्यादी सर्व महापालिकांना एका अर्थाने लाजवले आहे; आणि दुसऱ्या अर्थाने त्यांच्यापुढे आदर्श ठेवला आहे. पुणे हे महाराष्ट्राचे शैक्षणिक व सांस्कृतिक राजधानीचे शहर असे मोठ्या अभिमानाने म्हटले जाते. परंतु पुण्याच्या महापालिकेतील विद्वान नगरसेवकांना ग्रंथांचे मोल विशेष कळलेले आहे असे क्वचितच दिसले. काही ग्रंथालयांना पुणे महापालिका दहावीस हजार अनुदान देते. पण तेही हे ग्रंथालय भाजपाचे किंवा अमक्यातमक्याचे - हे लक्षात घेऊन नगरसेवकांच्या थैलीचे तोंड कमी जास्त उघडले जाते. निखळ साहित्यप्रेम तेथे नसते! राजकीय व इतर मारामाऱ्यातच नगरसेवकांचा सगळा वेळ जातो. सांस्कृतिक-शैक्षणिक विकासाचे येथे कोणाला सोयरसुतक नसते. त्यामुळे नाशिक महापालिकेच्या नगरसेवकांनी ग्रंथयात्रेबाबत असा पुढाकार घ्यावा आणि त्याचे दृष्ट लागण्याजोगे नेटके संयोजन करावे याचे अप्रूप वाटते. नाशिक महापालिकेचा आदर्श इतर महापालिकांनी आणि नगरपालिकांनाही बाळगायला हवा.

या ग्रंथयात्रेत ग्रंथव्यवहारही लक्षणीय झाला. विक्रीचे नेमके आकडे उपलब्ध नसले तरी अक्षरधारा, मेहता पब्लिशिंग हाऊस, मॅजेस्टिक प्रकाशन, राजहंस प्रकाशन, पॉप्युलर प्रकाशन वगैरेंची विक्री जोरात झाली. सदानंद भटकळ यांनी नुकताच हजार रुपये किंमतीचा वाङ्मयकोश काढला आहे. त्याची हजार रुपये किंमत आहे, पण त्याच्याही प्रती चांगल्या गेल्या. सर्वच प्रकारच्या पुस्तकांना मागणी होती. लोक उत्साहाने ग्रंथ चाळत होते; पुन:पुन्हा येत होते आणि पुस्तके घेत होते.

या ग्रंथयात्रेचे उद्घाटन कवी ना. धों. महानोर यांच्या हस्ते झाले. समारोप आर. के. लक्ष्मण आणि दिग्दर्शक गुलजार यांच्या उपस्थितीत झाला. वाङ्मयीन चर्चा-परिसंवादातही अनेक मान्यवरांना आवर्जून बोलावले होते. ग्रंथयात्रा संपल्याने सर्वांनाच चुकल्याचुकल्यासारखे वाटले. नाशिकच्या या पहिल्याच ग्रंथयात्रेच्या या अपूर्व यशावर त्यामुळे शिक्कामोर्तब झाले. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक राजधानीपदाविषयी आता एकापेक्षा अधिक दावेदार निघणार असे दिसते. निकोप सांस्कृतिक स्पर्धा महाराष्ट्रातल्या महानगरात सुरू झाली तर ती स्वागतार्हच ठरेल!

नाशिक महापालिकेच्या सर्व पदाधिकाऱ्यांना आणि नगरसेवकांना मराठी प्रकाशकांच्या वतीने मन:पूर्वक धन्यवाद!

सुनील मेहता

*—संपादक*

# नोबेल पुरस्काराचे मानकरी : जोझ सरमागो

भारत आणि पोर्तुगाल यांचे नाते तसे अनेक शतकांचे. त्यात ताणतणाव असले तरी कुठेतरी समाईक भावबंधाचे एक स्मृतिबन या दोन्ही देशातील नागरिकांत आहेच. त्यामुळेच अग्रगण्य पोर्तुगीज कादंबरीकार जोझ सरमागो यांना या वर्षाचा वाङ्मयविषयक नोबेल पुरस्कार जाहीर झाला ही बातमी आपल्यालाही आनंदाची वाटेल. पोर्तुगीज भाषेच्या लेखकाला हा मान पहिल्यांदाच मिळत आहे. सरमागो यांचे वय ७७ आहे; १९७७ साली त्यांची पहिली कादंबरी 'मॅन्युएल डे पिंटुरा ए कॅलिग्राफिया' प्रसिद्ध झाली. म्हणजे वयाच्या पन्नाशीनंतर त्यांच्या कादंबरी लेखनाला आरंभ झाला; आणि त्यानंतरही त्यांच्या मेमोरियल डो कॉनव्हेन्टो (१९८०), ओ इव्हान जेल्हो सेगुन्डो जीझस ख्राइस्ट (१९९१), बाल्टासार अँड ब्लिमुन्डा (१९८२), स्टोन बोट (१९९२) या कादंबऱ्या एका पाठोपाठ एक येत राहिल्या आणि त्यांनी यूरोपियन वाचकवर्गाला भुरळ घातली. सालाझारच्या हुकुमशाहीखाली १९२५ ते १९७४ ही पन्नास वर्षे पोर्तुगालने काढली. सालाझार १९६८ मध्ये वारला; परंतु त्यानंतर मार्सेलो कैटानो यानेही सालाझारच्याच धोरणाचा पाठपुरावा करून जनतेची छळणूक केली. विचारस्वातंत्र्यावर कडक निर्बंध लादले. विरोधकांची मुस्कटदाबी केली. सत्ताधीशांवर टीका करणारे लेखन केले तर पत्रकार आणि साहित्यिक यांचाही निर्घृण छळ केला जाई; त्यांना चौकशीविना कारावासात डांबले जाई. सेन्सॉरशिपच्या जाचक तरतुदींमुळे पोर्तुगीज भाषक लेखक मुक्तमनाने एक शब्दही लिहू शकत नसत. जे कधी प्रकाशितच होऊ शकणार नाही असे पोर्तुगालमधील फॅसिस्ट राजवटीचे चित्र रंगवून तरी काय फायदा असा प्रश्न लेखकांना पडे; आणि स्वत:ची लेखणी म्यानात ठेवणेच इष्ट असा व्यवहारी पवित्रा ते घेत. त्यामुळे १९७४पर्यंत पोर्तुगीज भाषेत खऱ्या अर्थाने वाङ्मयाला बहर आलाच नाही. १९४० नंतर मार्क्सवादी जीवनदृष्टीचा प्रच्छन्नपणे पुरस्कार करणारी नव-वास्तववादाची क्षीण लाट तेथे आली, परंतु सेन्सॉरच्या काकदृष्टीपुढे ती वाढण्यास अवसर मिळाला नाही. तरी तिचा प्रभाव अप्रत्यक्षपणे लेखकांवर राहिलाच. समाजपरिवर्तनाचा संदेश देणाऱ्या धीरोदात्त नायकांचे आणि मध्यमवर्गीय जीवनातील सुखदु:खाचे चित्रण कथाकादंबऱ्यांतून होत राहिले. सार्त्रच्या अस्तित्ववादी विचारसरणीचेही काही लेखकांना आकर्षण वाटले. कार्लोस डी ऑलिव्हेरा याच्या काव्याचे संग्रह १९४२पासून प्रसिद्ध होत राहिले. 'दि पोएम अटेन्स सच कॉन्सेंट्रेशन दॅट इट ट्रॅन्स्फॉर्मस ल्युसिडिटी इटसेल्फ टू एनर्जी अँड एक्स्प्लोडस टू कम आउट ऑफ इटसेल्फ' अशा शब्दात तो आपल्या आंतरिक ऊर्जेचा परिस्फोट रसात्मक काव्यात होण्याची प्रक्रिया विशद करतो. जोर्ज डि सेना हा कथाकार, समीक्षक, नाटककार आणि कवी अशा विविध भूमिकांतून आपल्या अचाट प्रतिभेची उधळण करणारा आघाडीवरचा साहित्यकार. परंतु १९५९ मध्ये त्याला देशत्याग करणे भाग पडले; आणि ब्राझील व अमेरिका यांच्या आश्रयाला जाऊन शिक्षक म्हणून गुजराण करणे क्रमप्राप्त ठरले. १९७४मध्ये पोर्तुगालमध्ये रक्तहीन लष्करी क्रांती झाली आणि पोर्तुगालमध्ये लोकशाही



राजवटीचे युग सुरू झाले. अंगोला, मोझांबिक या वसाहतींना स्वातंत्र्य दिले गेले. त्यानंतर सेनाला पोर्तुगालमध्ये परतायचे होते. परंतु ते जमले नाही. १९७८ साली त्याचे देहावसान झाले. दि वन्डरस फिजिशियन (१९७७) आणि बाय दि रिव्हर्स ऑफ बॅबिलोन (१९८९) ही त्याची कथांची पुस्तके सत् आणि असत्, पाप आणि उत्तरदायित्व यांचा शोध घेणारी आहेत.

लुइ दि स्टाऊ मॉंटेरो, बर्नार्डो संतारेनो, फर्नांडो नामोरा, ऑगस्टो अबेलेरा, व्हेरगिलो फेरेरा, जोझ कारडोसो पायर्स, अल्मीडा फारिया हे गेल्या पन्नास वर्षातील प्रमुख पोर्तुगीज लेखक मानले जातात. परंतु गेल्या तीस वर्षातील त्या सर्वांचा मुकुटमणी म्हणून जोझ सरमागो याचेच नाव सर्वजण घेतात. त्यामुळे त्याला नोबेल पुरस्कार मिळाला हे योग्यच झाले असे निर्विवादपणे सर्वांना वाटते. १९२२ साली सामान्य कुटुंबात जन्म झालेल्या जोझला फारसे शिक्षण मिळाले नाही; ते काम करून अनुभवानेच स्वयंशिक्षण करावे लागले. पुढे पत्रकारितेच्या व लेखनाच्या क्षेत्रात त्याने जाणीवपूर्वक प्रवेश केला. इतर बहुसंख्य लेखकांप्रमाणेच आधी त्यानेही काव्यलेखन केले. काही नाटकेही लिहिली. परंतु वयाच्या ५५व्या वर्षी 'मॅन्युअल ऑफ पेंटिंग अँड कॅलिग्राफी' ही त्याची पहिली कादंबरी प्रसिद्ध झाली आणि त्याचे नाव गाजू लागले. या कादंबरीचा नायक हा सामान्य कुवतीचा चित्रकार आहे. आपल्या आत्मशोधाचा मार्ग म्हणून तो लेखनाकडे वळतो. एका राजकीय कैद्याच्या बहिणीशी आणि स्वत:चे पोर्ट्रेट काढून घेण्यासाठी आलेल्या एका गृहस्थाच्या प्रेयसीशी संबंध आल्यावर त्याला एकदम साक्षात्कार होतो की अरे, चित्रकला हे आपले खरे माध्यम नव्हे. लेखन करण्यासाठीच आपला जन्म आहे. हा साक्षात्कार होतो तो दिवस असतो २५ एप्रिल १९७४ हा! पोर्तुगालमध्ये रक्तहीन राज्यक्रांती झाली तोच हा दिवस. या कादंबरीमुळे एका नवेच वाङ्मयीन वातावरण निर्माण होते. इतके दिवस सालाझारच्या सत्तेखाली गुदमरलेल्या प्रतिभावंतांचा आवाज खुला होतो. दडपण दूर होते. क्षितिजाला गवसणी घालण्याचे बळ अंगात येते. १९८० साली सरमागोची दुसरी कादंबरी 'लेवांताडो दो चाओ' (धरणीवरून उचललेले) प्रसिद्ध झाली. तिच्या सत्यघटनांचा मागोवा घेत ग्रामीण शेतमजुरांच्या चार पिढ्यांची कर्मकहाणी उलगडली जाते. १९२० ते १९७४ असा पंचावन्न वर्षांचा कालखंड या कादंबरीत येतो; अस्तित्वाच्या संघर्षात स्त्रिया किती चिवटपणे आपली परंपरागत मूल्ये घट्ट धरून ठेवतात याचेही या कादंबरीत नेटके दर्शन घडते.

बाल्टासार अँड ब्लिमुंडा या १९८२ साली प्रसिद्ध झालेल्या कादंबरीत एका 'कॉन्व्हेंट'मधील ऐतिहासिक आठवणींचा खजिना खुला झाला आहे. लिस्बन शहराजवळच्या दोनशेवर वर्षापासून चालत आलेल्या या धर्म-गृहातील भल्याबुऱ्या जीवनशैलीचे भेदक, उपरोधपूर्ण वास्तव लोककथेच्या ढंगात चितारलेले आहे. या आश्रमाची उभारणी करताना बांधकाम मजुरांना आलेले अनुभव आणि फादर बार्थोलोम्यू दि गुस्मावोच्या आग्रहामुळे पासारोला हे हवेत उडणारे साधन निर्माण करताना घडलेले नाट्यपूर्ण प्रसंग यातून धर्मसत्ता व राज्यसत्ता यांच्यातील संघर्ष उभा राहतो. लढाईत हात गमावलेला बाल्टासार आणि

अतींद्रिय शक्ती अंगी असणारी ब्लिमुंडा या दोघांतील प्रेमकहाणीचे उपकथानकही या कादंबरीला शीर्षक म्हणून आल्याने भाव खाऊन जाते. हे कॉन्व्हेंट १७३० मध्ये त्यावेळचा उधळ्या राजा पाचवा जॉन याने आपण केलेल्या एका धार्मिक नवसापोटी बांधलेले असल्याने कथावस्तूला राजसत्तेच्या अंतर्गत ताणतणावांचाही जोड मिळालेली आहे. राजापेक्षा जनतेच्या बाजूनेच सरमागो आपली साहित्यिक सहानुभूती झुकत्या मापाने वापरतो हेही वाचकांना सुखावून जाते.

१९३० सालच्या दरम्यान लिस्बनमध्ये जे दहशतीचे वातावरण होते त्याची मर्मभेदक अवस्था दि इयर ऑफ डेथ ऑफ रिकार्डो रीस या कादंबरीत सरमागोने रेखाटली आहे. पेसोआ हा कवी नुकताच मरण पावलेला आहे आणि त्याने निर्माण केलेले एक रिकार्डो रीस नामक काल्पनिक पात्र - अशा दोन नायकांना सामावून घेणारी ही कादंबरी आहे रिकार्डो रीसचे हॉटेलमधील मोलकरीण लिडिया, मध्यमवर्गीय मर्सेडा, या दोघींशी संबंध आहेत. कवीच्या रचनातून त्यावेळच्या सालाझारच्या सर्वंकष जुलमाखाली साहित्याचीच नव्हे तर सर्वच क्षेत्रांची कशी घुसमट होत होती याची झलक दिसते. विविध विषयांवरचे चिंतनही कथानकाच्या ओघात येते आणि त्यामुळेच सरमागोला स्वतःला ही कादंबरी सर्वात जास्त महत्त्वपूर्ण वाटते. दि स्टोन बोट (१९८६), दि स्टोरी ऑफ दि सिएज ऑफ लिस्बन (१९८९), दि गॉस्पेल ॲकार्डिंग टू जीझस ख्राइस्ट' (१९९१) या त्याच्या कादंबऱ्याही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. दि स्टोन बोटची कल्पना मोठी चमत्कृतिपूर्ण आहे. यूरोपपासून एक भूभाग हा अलग होऊन स्वतंत्र द्वीप म्हणून आपले वेगळेपण घोषित करतो. मूळ यूरोपशी असणारे आपले सांस्कृतिक व एकात्मतेचे नाते आता कसे जपता येईल या बद्दलच्या विविध शक्यता त्यात तपासण्यात आल्या आहेत. येशू ख्रिस्ताचे जीवनचरित्र आजच्या चंगळवादी भौतिक संस्कृतीच्या संदर्भात कसे दिसेल याचे कल्पनारम्य चित्रही 'दि गॉस्पेल' मध्ये आले आहे. या कादंबरीवर पोर्तुगालच्या सनातनी राज्यकर्त्यांनी मोठी टीकेची झोड उठवली आणि तिला पुरस्कार देण्याला नकार दिला.

कादंबऱ्यांचे हे विषय व एकूण जीवनविषयक भूमिका या दृष्टीने पाहिल्यास सरमागोच्या कादंबऱ्या आणि लेखन हे आपल्यालाही परके वाटणार नाही. आज जगभरचे साहित्य हे आपली प्रादेशिकता एकीकडे जपत असतानाच दुसरीकडे विश्वात्मक आवाहनही करीत आहे. हे आवाहन सर्वांना समजण्यासारखे, भिडण्यासारखे, मानवतावादाचे व मांगल्याचे आहे. लिस्बनमध्ये सालाझारच्या जुलमी सत्तेखाली सर्वसामान्य जनतेची व कलावंतांची कुचंबणा झाली तशीच हिंदुस्थानात ब्रिटिश राजवटीत आपल्या जनतेची व कलावंतांची कुचंबणा झाली. सरमागोने त्या घुसमटीचे ज्वलंत व प्रत्ययकारक चित्रण केले; आणि जनतेच्या मनातील सुप्त भावभावनांचे प्रातिनिधिक प्रकटीकरण केले. सरमागोच्या साहित्यिक योगदानावर नोबेल पुरस्कार समितीने शिक्कामोर्तब केले; ज्या बद्दल वाद होण्याला वाव नाही अशीच ही निवड आहे.

*–शंकर सारडा*



# साहित्य वार्ता

## नाशिक ग्रंथयात्रा

नाशिक महापालिकेने आयोजित केलेली भव्य ग्रंथयात्रा ही साहित्यसेवेच्या कार्यातील ऐतिहासिक व परिवर्तन घडविणारी घटना आहे. शिक्षणाची राजधानी पुणे असली आणि भारताची आर्थिक राजधानी मुंबई असली तरी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, कला व साहित्य क्षेत्राची राजधानी खऱ्या अर्थाने नाशिकच आहे, असे प्रतिपादन विख्यात निसर्गकवी ना. धों. महानोर यांनी नाशिक महापालिका आयोजित 'ग्रंथयात्रा ९८'च्या प्रसंगी केले.

हस्त नक्षत्राच्या धुवाँधार पावसाने कार्यक्रमाच्या वेळी हजेरी लावल्यामुळे उद्घाटन सोहळा ऐन वेळी परशुराम सायखेडकर नाट्यमंदिरात हलवावा लागला, तेव्हा 'नको नको रे पावसा असा धिंगाणा घालू' या कवितेच्या ओळी ऐकवीत महानोर म्हणाले, "माझ्यासारख्या पावसाळी कवीऐवजी एखादा दुष्काळी कवी बोलवायला हवा होता म्हणजे पाऊसही थोडा वरमला असता." उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महापौर अशोक दिवे होते.

महानोर म्हणाले, 'मी साहित्यिकांमधला भटका विमुक्त आहे. महाराष्ट्रभर फिरत असतो. गेल्या दहा वर्षात साहित्य, कला आणि संस्कृतीच्या क्षेत्रात जितके नाशकात घडले आहे तितके मुंबईपुण्यातही घडलेले नाही. या शहरात येताना माझ्या अंगावर नेहमीच रोमांच उभे राहतात. या शहराचे आरोग्य व सार्वजनिक सुविधा पुरवण्याचे प्राथमिक काम करणाऱ्या महापालिकेला लोकांना सुसंस्कृत करणाऱ्या ग्रंथयात्रेचे आयोजन करण्याची कल्पनाही सुचते व सारे गाव या उपक्रमाच्या पाठीशी उभे रहाते, ही घटना अपूर्व आहे. ग्रामीण भागात पुस्तके पोहोचली नसती तर माझ्यासारखा शेतकरी किंवा कोणीही मागसवर्गीय माणूस लेखक होऊच शकला नसता. अशा होतकरू लेखकांना एखाद्या वारकऱ्याच्या भूमिकेतून या ग्रंथयात्रेत यावेसे वाटेल. अशा ग्रंथयात्रा दर दोन वर्षांनी महाराष्ट्राच्या विविध भागात आयोजित व्हायला हव्यात. यातूनच नव्या पिढीतला सुसंस्कृत महाराष्ट्रात घडेल."

राज्य सरकार आजारी साखर कारखाने, पाटबंधारे खात्याच्या योजना, रोजगार हमी सारख्या योजनांवर कोट्यवधी रुपये खर्च करते. मात्र सांस्कृतिक क्षेत्राला, साहित्य व कलेच्या क्षेत्राला भरघोस सहाय्य देण्यासाठी हात आखडता घेते. आपला वैचारिक व सांस्कृतिक वारसा गिरवणारा महाराष्ट्र या गोष्टीत मागे का राहतो? महाराष्ट्राची 'ललित लेणी' व 'महाराष्ट्राचे शिल्पकार' थोड्क्या किमतीत उपलब्ध करून देण्याची योजना मी लोकप्रतिनिधी असताना मांडली होती. ती मंजूरही झाली. पण तिची कार्यवाही मात्र अजूनही

मंदगतीनेच सुरू आहे. महाराष्ट्रातल्या ग्रंथप्रेमी माणसाला सरकारची अनास्था निराश करणारी आहे. परभणीचे कवी बी. रघुनाथ म्हणाले होते, मी गेल्यावर माझ्याबरोबर दुसरे काही नको, फक्त माझ्या सुंदर पुस्तकांचे गाठोडे बरोबर द्या. मराठी मातीच्या या आर्त आवाजाची आपण दखल घेणार आहोत की नाही, असा सवाल त्यांनी केला.

मराठी साहित्याच्या प्रदीर्घ वाटचालीचा आढावा घेत आपल्या भाषणात महानोरांनी ग्रंथपालाचे काम करणाऱ्या ग्रंथसेवकांच्या वेतनश्रेणीबद्दल, प्रकाशकांच्या अडचणींबद्दल, पुस्तकांच्या किंमतीबद्दल अनेक दाखले देत उपस्थितांचे प्रबोधन केले.

स्थायी समितीचे अध्यक्ष शाहू खैरे यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले, "यशवंतराव चव्हाण नाशिकलाच म्हणाले होते, 'प्रत्येक गावात मोठे देवालय असले तरी प्रत्येकाच्या घरात छोटा देव्हारा असतोच. गावात सरस्वतीचे मंदिर असलेले समृद्ध वाचनालय असले तरी घरातल्या छोट्या देव्हाऱ्याप्रमाणे प्रत्येकाने दोन ग्रंथ खरेदी करायलाच हवेत.' हे उद्‌गार माझी पिढी अद्याप विसरलेली नाही. याच भावनेतून आम्ही ग्रंथयात्रा आयोजित केली आहे." महापौर अशोक दिवे यांनी उपक्रमास शुभेच्छा देताना सर्व नगरसेवकांचे अभिनंदन केले. नाशिकचे महसूल आयुक्त रमेश उबाळे यांचेही भाषण झाले.

ग्रंथयात्रेत १३८ स्टॉल्समध्ये एकूण राज्यातले व राज्याबाहेरचे ७६ प्रकाशक सहभागी झाले होते.

## कुसुमाग्रजांच्या सोनियाच्या पावलांनी ग्रंथयात्रा धन्य धन्य झाली!

नाशिक महापालिका आयोजित ग्रंथयात्रेला बुधवारचा दिवस म्हणजे 'सोनियाचा दिन' ठरला. ज्यांच्या पायाशी सर्व साहित्य नतमस्तक होते, असे कविश्रेष्ठ कुसुमाग्रज ऊर्फ वि. वा. शिरवाडकर यांनी ग्रंथयात्रेला भेट दिली आणि तेथे उपस्थित प्रत्येक स्टॉलधारकाला धन्य धन्य वाटले.

कुसुमाग्रज हल्ली शक्यतो कुठे जात नाहीत आणि सार्वजनिक कार्यक्रमांपासून तर ते दूरच राहणे पसंत करतात; परंतु अलौकिक अशी ग्रंथयात्रा शहरात भरली. ज्या ग्रंथांना उभी हयात देवासमान मानले, त्या सर्व दुर्मिळ, अद्‌भूत, विविध विषयांवरील पुस्तकांची जत्रा शहरात भरली आणि तात्यासाहेब त्या ठिकाणी गेले नाहीत, असे होणे अशक्यच! तात्यासाहेब येणार नाहीत, ही शंका दूर झाली आणि प्रत्येक प्रकाशकाला आपल्या दालनाला तात्यांनी भेट द्यावी, असे वाटू लागले. तात्यासाहेब हळूहळू विविध दालनांमध्ये जात होते, ग्रंथ चाळत होते, प्रकाशकांशी चर्चा करीत होते, सद्यःस्थितीवर मतप्रदर्शन करीत होते आणि तेव्हाच ग्रंथयात्रेतील सहभागी झालेले प्रकाशक हा अनमोल ठेवा जेवढा साठविता येईल तेवढा आपल्या डोळ्यात साठवून घेत होते.

## 'गमतीच्या गप्पागोष्टी' मध्ये मुलांपेक्षा माणसेच रमली

मुलांनी नेहमी हसतमुख राहिले पाहिजे, हसण्याची सवय केली पाहिजे. मी तर



हसण्यासाठी फार सोसले आहे. आजची मुले संस्कार घेतात परंतु ह्याचं विसरतात, अशी खंत दूरदर्शनवरील निवेदक अनंत भावे यांनी व्यक्त केली.

ग्रंथयात्रेतील 'गप्पागोष्टी गमतीच्या' या कार्यक्रमात ते बोलत होते. अनंत भावे, मिलिंद आमडेकर यांनी बालसाहित्यातील कथा, कविता, विनोद सांगितले. मिलिंद आमडेकर यांनी कुलाबा किल्ला, कर्नाला अभयारण्य, काश्मिरमधील सिंथन आणि मार्गर खिंडी याबद्दलचे कथानक सांगितले. त्याबरोबरच साहसवीरांच्या साहसकथाही त्यांनी सांगितल्या. परंतु या कार्यक्रमाला मुलांपेक्षा प्रौढांचीच गर्दी अधिक होती.

## बोलका दिवाळी अंक

फ्लॅश म्युझिकने ध्वनिफितीच्या रूपात पहिला बोलका दिवाळी अंक आनंदपर्व या नावाने प्रसिद्ध केला आहे. त्याचे संपादन सुभाष इनामदार यांनी केले असून फ्लॅश म्युझिकचे संचालक चारुदत्त गोखले हे प्रकाशक आहेत. शांत शेळके यांनी काजळठिपका ही कथा सांगितली आहे; वसंत बापट, सुधीर मोघे, चंद्रशेखर गोखले यांनी काव्यविषयक अनुभव सांगितले आहेत. कुसुमाग्रज – ग्रेस प्रभृतींच्या कविता अरुणा ढेरे यांनी सादर केल्या आहेत. दोन कॅसेटचा संच ७० रुपयात उपलब्ध आहे.

## कोकणचा इतिहास

कोकणचा इतिहास दहा खंडात लिहिण्याचा प्रकल्प इतिहास संशोधन मंडळाने हाती घेतला आहे. कोकणातील मठ, पूजास्थाने आणि मशिदी, यांची माहिती एका खंडात देण्यात येणार आहे. संपर्क : डॉ. वि. गो. खोबरेकर, इतिहास संशोधन मंडळ, १७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग, दादर, मुंबई ४०००१४. (फोन – ४१३४२११, ४१३२२१२)

## स्पर्शगंध : अंधांसाठी दिवाळी अंक

ब्रेललिपीतील पहिला दिवाळी अंक काढण्याचा अभिनव उपक्रम न्यूजनेट या संस्थेमार्फत करण्यात आला असून, त्यात शांता शेळके, शंकर सारडा, वि. भा. देशपांडे यांचे लेख, कुसुमाग्रज, पाडगावकर, रामदास फुटाणे आदींच्या कविता, पाककृती, ब्रेल लिपीतील लेख, अंध साहित्यिक कवींचे लेख वगैरे साहित्य देण्यात आले आहे. संपर्क : स्वागत थोरात, विजय कॉम्प्लेक्स, ७५९/१५ डेक्कन जिमखाना, पुणे ४.

## ठाणे मॅजेस्टिक बुक डेपोचा वर्धापनदिन

ठाणे येथील मॅजेस्टिक बुक डेपोच्या प्रथम वर्धापनदिनानिमित्त महाराष्ट्र टाइम्सचे कार्यकारी संपादक अशोक जैन यांच्या हस्ते बुक क्लबची सोडत काढण्यात आली. विजेत्यांनी मॅटी नायलॉनची बॅग भेट देण्यात आली. जैन म्हणाले, "प्रत्येक घरात गॅसचं

कनेक्शन असतं तसं शहराच्या प्रत्येक भागात पुस्तकाचं दुकान असलं पाहिजे. प्रत्येक फ्लॅटमध्ये पुस्तकांसाठी एखादं कपाट असलं पाहिजे.'' अशोक कोठावळे यांनी स्वागत करताना म्हटले, ''आमच्या ग्रंथदालनाला वेळ असेल तेव्हा भेट द्या. तुमच्या आनंदात भर पडेल. नैराश्य दूर पळून जाईल.'' 'शितू'चे अभिवाचनही यावेळी झाले.

## स्मृतिसुगंधचे प्रकाशन

'नियतीने माझ्यासारख्या छोट्या गावातील एका स्त्रीची जन्मगाठ मधू लिमये यांच्यासारख्या एका प्रखर, निडर व्यक्तीशी बांधली आणि मला थेट भारताच्या राजधानीत पोचवले. केवळ त्यामुळेच एका छोट्या डबक्यातील मासोळी महासागरात पोचली आणि जीवनवैविध्य अनुभवून कृतार्थ झाली,' असे उद्गार श्रीमती चंपा लिमये यांना काढले.

'स्मृति सुंगध' हे मधू लिमये यांच्या सहवासातील आठवणींचे शब्दांकन आपण त्यांच्याच स्मृतीला अर्पण का केले आहे हे श्रीमती लिमये यांनी सांगितले. समाजवादी नेते मधू लिमये यांच्या विपुल, असंकलित लेखनातून आणखी तीन-चार पुस्तके लवकरच सिद्ध होणार आहेत.

विलेपार्ले येथील लोकमान्य सेवा संघाच्या सहकार्याने पाच ग्रंथांचे प्रकाशन ज्येष्ठ पत्रकार माधव गडकरी यांच्या हस्ते झाले. मधू लिमये लिखित 'पेच राजकारणातले', 'राष्ट्रपिता' व 'सौहार्द' आणि त्यांच्या पत्नी चंपा लिमये यांनी लिहिलेले 'स्मृतिसुगंध' ही मुख्य चार पुस्तके होती. त्याखेरीज हैदराबाद स्वातंत्र्यसंग्रामाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त प्रा. ना. य. डोळे लिखित 'हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम' हे छोटेखानी पुस्तकही प्रकाशित करण्यात आले.

## वाटचालीचा आढावा

५ डिसेंबरपासून ग्रंथालीचे रौप्यमहोत्सवी वर्ष सुरू होत आहे. तसेच सरत्या शतकाचा वेध घेणारी एक हजार पुस्तके येत्या १५ ऑगस्ट ९९ पासून रोज एक याप्रमाणे प्रकाशित करण्याची आणि प्रत्येकी केवळ १८ रुपये याप्रमाणे संपूर्ण संच १८ हजार रुपयांना विकण्याच्या एका महत्त्वाकांक्षी ग्रंथ प्रकल्प राबवण्यात येणार आहे.

## श्याम मनोहर यांच्या नाटकांचा महोत्सव

नाशिकच्या नाट्यक्षेत्रात स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केलेल्या प्रयोग परिवारातर्फे श्याम मनोहर यांच्या तीन नाटकांच्या महोत्सवाचे प. सा. नाट्यगृहात आयोजन करण्यात आले. 'यकृत', 'हृदय', 'यळकोट' या तीन नाट्यकृतींचा नाट्यमहोत्सव ९ ते ११ ऑक्टोबर दरम्यान झाला. प्रयोग परिवार ही प्रायोगिक नाटके सादर करणारी प्रायोगिक नाट्यसंस्था असून, सुरुवातीच्या काळात या संस्थेने अतुल पेठेंच्या मार्गदर्शनाखाली विविध नाटकांचे



प्रयोग विविध ठिकाणी आयोजित केले होते.

## पुस्तक प्रकाशित झाल्याशिवाय लेखकास मान्यता मिळत नाही

'सातव्या मुलीची सातवी मुलगी' या मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे यांनी प्रकाशित केलेल्या अशोक पाटोळे लिखित विनोदी कथासंग्रहाचे प्रकाशन दादरच्या राजर्षी शाहू सभागृहात झाले. त्यावेळी वसंत सबनीस हे प्रमुख पाहुणे होते.

''आज एका विनोदी लेखकाचा जन्म झाला आहे. कारण कुणी कितीही मालिका, नाटके, चित्रपट लिहिले तरी जोपर्यंत एखादे पुस्तक प्रकाशित होत नाही, तोवर विनोदी लेखकाला मान्यता मिळत नाही, आमच्या विनोदी साहित्यिकांच्या यादीत अशोक पाटोळे या आणखी एका नावाची भर पडली आहे,'' असे उद्गार विनोदी लेखक वसंत सबनीस यांनी काढले.

आपल्या आभारप्रदर्शनाच्या भाषणातून विनोदाची झलक दाखविताना अशोक पाटोळे म्हणाले : ''आजवर मी फक्त प्रेक्षकांचा होतो, आता वाचकांचाही झालो. आपल्या लेखनाचं श्रेय आपण शुद्धलेखनाचे मास्तर व दुसरे 'आवाज'चे मधुकर पाटकर यांना देतो. एकजण लिहिलं नाही तर 'आवाज' काढायचा - दुसरा माझं लिहून झालं की 'आवाज' काढायचा!''

## 'नथुरामायण'चे प्रकाशन

''जेव्हा इतिहास विवाद्य ठरतो, तेव्हा तेथे डावपेचांना जागा उरत नाही. घडलेल्या घटना आणि त्यांच्या संबधीचे दस्ताऐवज यांची मुळातून वैज्ञानिक पद्धतीने चिकित्सा करून मगच इतिहाससंशोधकाला निर्णय द्यावा लागतो. त्या आधारे स्वत:चे मत बनविण्याचा अधिकार प्रत्येक वाचकाला लोकशाहीत असलाच पाहिजे,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत इतिहाससंशोधक डॉ. य. दि. फडके यांनी केले.

प्रदीप दळवीलिखित 'मी नथुराम गोडसे बोलतोय' या नाटकावरून उठलेल्या वादळानंतर डॉ. फडके यांनी, ९ ऑगस्ट १९९७ ते ४ सप्टेंबर १९९८ या प्रदीर्घ कालावधीत 'आपलं महानगर' या सायंदैनिकातून लिहिलेली 'नथुरामायण' ही लेखमाला संपादक निखिल वागळे यांनी आपल्या अक्षर प्रकाशनातर्फे ग्रंथबद्ध केली आहे. या पुस्तकाचे प्रकाशन नायगावच्या मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले.

राजकीय हेतूने गांधीजींच्या खुन्याचे हुतात्मीकरण करणारे प्रदीप दळवी तसेच 'महात्म्याची अखेर'मध्ये गांधीभक्तीच्या अतिरेकी टोकातून अनैतिहासिक विधाने करणारे जगन फडणीस या दोघांचेही लेखन कसे अस्वीकारणीय आहे, हे या वेळी डॉ. फडके यांनी स्पष्ट केले.

नथुरामने केलेल्या कृत्याचे समर्थन करण्यासाठी गोपाळ गोडसे यांनी लिहिलेल्या पुस्तकाच्या तेरा आवृत्त्या निघाल्या. पण डॉ. फडके यांनी लिहिलेले 'नथुरामायण' हे या संपूर्ण प्रकरणातील ऐतिहासिक सत्य आहे. हे सत्य खेड्यापाड्यातील तरुण पिढीपर्यंत पोचावे यासाठी या पुस्तकाची सवलतीत विक्री करण्याकरिता विविध पुरोगामी विश्वस्त संस्था, कामगार संघटना यांनी अक्षर प्रकाशनाला साह्य करावे असे आवाहन प्रकाशक निखिल वागळे यांनी यावेळी केले.

आविष्कार स्वातंत्र्याचे प्रथमपासून समर्थन करणारे अभिनेते दिग्दर्शक अमोल पालेकर यांनी या प्रकाशन सोहळ्यात बोलताना सेन्सॉरशिपचा सविस्तर ऊहापोह करून दळवींच्या नाटकावरील बंदीचाही निषेध केला. बंदी-आंदोलनाऐवजी, विचारांना विचारांनीच उत्तर दिले पाहिजे, असे सांगून, ते कार्य या पुस्तकाद्वारे डॉ. फडके यांनी केल्याचे श्री. पालेकर म्हणाले.

'लोकसत्ता'चे संपादक डॉ. अरुण टिकेकर यांनी मात्र, पन्नास टक्के निरक्षरांच्या आपल्या लोकशाहीत सेन्सॉरशिप कशी आवश्यक आहे, हे दळवींच्या नाटकांच्या निमित्ताने पुन्हा एकदा जाणवल्याचे प्रतिपादन केले.

मुंबई विद्यापीठाचे माजी इतिहास विभागप्रमुख डॉ. जे. व्ही. नाईक यांनी डॉ. फडके यांचा 'इतिहासाचार्य राजवाडे यांचे वारसदार' म्हणून या वेळी गौरव केला. 'नथुराम ही एक व्यक्ती नसून प्रवृत्ती होती. गांधीजींच्या विचारांचा विचारांनी सामना करण्याची कुवत नव्हती, म्हणून त्यांचा खून करण्याचे भेकड कृत्य त्याने केले,' असे पुस्तकाचे प्रकाशन करताना चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी सांगितले.

## श्रद्धांजली

नामवंत वऱ्हाडी कवी आणि स्वावलंबी अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य देवीदास गंगाराम सोटे यांचे २९ सप्टेंबर रोजी वर्धा येथे विजेचा झटका बसून निधन झाले. त्यांचे वय ६८ होते. सोटेशाही हा त्यांचा काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे. वऱ्हाडी बोलीतील त्यांच्या कविता एकेकाळी महाराष्ट्रातील कुठल्याही कविसंमेलनात रंग भरत. 'तुहं जमलं माहं तुटलं' हे नाटकही त्यांनी लिहिले. वऱ्हाडी बोलीचा शब्दकोशही त्यांनी तयार केला.




आपल्या नेतेमंडळींचा जीनिव्हामधला आचरटपणा पाहिला की वाटते,
ते देश विकायलाच परदेश-वारीवर आलेले असावेत.

**प्रत्यक्ष परिस्थितीवर आधारलेले परखड प्रतिपादन**

**भारत विकणे आहे**

किंमत : **१०० रु.**
सवलतीत : **८० रु.**
पोस्टाने : **९० रु.**

मूळ लेखिका : **चित्रा सुब्रह्मण्यम्** अनुवाद : **वि. स. वाळिंबे**




## इंग्रजीतील बेस्टसेलर कादंबऱ्या

**कादंबऱ्या**

| | | |
|---|---|---|
| १ | रेनबो सिक्स | टॉम क्लॅन्सी (पुटनाम) |
| २ | टेल मी युवर ड्रीम्स | सिडने शेल्डन (वुइल्यम मॉरो) |
| ३ | आय नो धीस मच इज टु | वॅली लॅम्ब (रेगन) |
| ४ | दि फर्स्ट गर्ल | टॉम हिलरमन (हार्पर कॉलिन्स) |
| ५ | नो सेफ प्लेस | रिचर्ड नॉर्थ पॅटरसन (नॉफ) |
| ६ | मेमॉयर्स ऑफ ए गेशा | आर्थर गोल्डन (नॉफ) |
| ७ | समर सिस्टर्स | ज्युडी ब्लूम (डेलाकोर्टे) |
| ८ | मेसेज इन ए बॉटल | निकोलस स्पार्क्स (वॉर्नर) |
| ९ | पॉइंट ऑफ ओरिजिन | पॉट्रीशिया कॉर्नवेल (पुटनाम) |
| १० | ब्रिजेट जोन्स डायरी | हेलन फील्डिंग (व्हायकिंग) |
| ११ | टेल मी युवर ड्रीम्स | सिडने शेल्डन (हार्पर कॉलिन्स) |
| १२ | दि इलेव्हन्थ कमांडमेंट | जॅफ्रे आर्चर (हार्पर कॉलिन्स) |
| १३ | टॉक्सिन | रॉबिन कुक (पॅन) |
| १४ | स्पेशल डिलिव्हरी | डॅनिएल स्टील (कोर्गी) |
| १५ | मेमॉयर्स ऑफ ए गेशा | आर्थर गोल्डन (व्हिंटेज) |
| १६ | डिटेक्टिव्ह | आर्थर हेले (बर्कले) |
| १७ | डिफिकल्ट डॉटर्स | मंजु कपुरी (पेंग्विन) |
| १८ | ओन्ली लव्ह | एरिक सेगल (पिअॅटक्स) |
| १९ | दि गॉड ऑफ स्मॉल थींग्ज | अरुंधती रॉय (इंडिया इंक) |
| २० | दि एव्हरेस्ट हॉटेल | आय ॲलन सीली (इंडिया इंक) |

**इतर पुस्तके**

| | | |
|---|---|---|
| १ | दि डे डायना डाइड | ख्रिस्तोफर ॲंडरसन (वुइल्यम मॉरो) |
| २ | ट्युज्डेज् वुईथ मॉरी | मिटच ॲलबोम (डबलडे) |
| ३ | ए पायरेट लुक्स ॲट फिफ्टी | जिम्मी बफेट (रॅंडम हाऊस) |
| ४ | दि डेथ ऑफ आउटरेज | वुइल्यम बेनेट (सिमन) |
| ५ | एंजेलाजू ॲशेस | फ्रॅंक मॅककोर्ट (स्क्रिबनेर) |
| ६ | ए वॉक इन दि वुडस | बिल ब्रायसन (ब्रॉड वे) |
| ७ | दि मिलिनेअर नेक्स्ट डोअर | स्टॅन्ले-डॅंको(लॉंगस्ट्रीट प्रेस) |
| ८ | कान्व्हर्सेशन्स वुइथ गॉड | नील डोनाल्ड वॉल्श (पुटनाम) |
| ९ | डायना : एक पोर्ट्रेट ऑफ ए प्रिन्सेस | जेन फिंचर, ज्युडी वेड (सिमन) |
| १० | ए मॉंक स्विमिंग | मॅलॅची मॅक्कोर्ट (हायपरियान) |
| ११ | सिलेक्टिव्ह मेमरी | शोभा डे (पेंग्विन) |
| १२ | इंडिया २०२० | अब्दुल कलाम (पेंग्विन) |
| १३ | दि पेंग्विन इंडिया गाइड टू चाइल्ड केअर | डॉ. आर. के. आनंद (पेंग्विन) |
| १४ | दि आयडिया ऑफ इंडिया | सुनील खिलनानी (पेंग्विन) |
| १५ | फिफ्टी इयर्स | आर. के. लक्ष्मण (टाइम्स) |
| १६ | दि सेव्हन स्पिरिच्युअल लॉज ऑफ सक्सेस | दीपक चोप्रा (एक्सेल) |
| १७ | इंडिया फ्रॉम मिडनाइट टू मिलेनियम | शशि थरूर (पेंग्विन) |
| १८ | १०० बेस्ट प्री-इन्डिपेन्डन्स स्पीचेस | एच. डी. शर्मा (हार्पर कॉलिन्स) |
| १९ | बीयॉन्ड बिलीफ | व्ही. एस. नायपॉल (व्हायकिंग) |
| २० | दि टनेल ऑफ टाइम | आर. के. लक्ष्मण (व्हायकिंग) |

# पुस्तक परिचय

**संस्कृतीचा विकास होत गेला तसतशी स्त्री ही पुरुषाच्या मागे मागे पडत गेली**

## भारतीय स्त्री जीवन

**डॉ. लीला पाटील**

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अनुदानित भारतीय स्त्री जीवन हा डॉ. लीला पाटील यांचा लेख संग्रह. त्यांनी वेळोवेळी लिहिलेल्या स्त्रीजीवनविषयक अशा या निवडक लेखाच्या संग्रहातील प्रत्येक लेख अभ्यासपूर्ण असल्याने वाचनीय झाला आहे.

एकूण संस्कृती विकसनाचा मागोवा घेत असता जसजशी संस्कृती विकसित होत गेली, तसतशी स्त्री ही पुरुषाच्या मागेमागेच पडत गेली, हे डॉ. लीलाबाईंनी सप्रमाण दाखवून दिले आहे.

कृषिपूर्व संस्कृती वा वनसंस्कृती ते शेतीचा शोध या काळात स्त्री ही पुरुषांच्या पुढे होती. पुरुषापेक्षा प्रगत होती. सार्वभौम होती. नंतर कृषिसंस्कृतीच्या पूर्वकालात स्त्री पुरुषाबरोबर होती तर कृषिसंस्कृतीच्या उत्तरकालात स्त्री पुरुषामागे पडली. दासी बनली, कारण आता पितृसत्ताक पद्धतीला प्रारंभ झाला होता, हे सूत्र या सर्व लेखांमधे आढळते.

अप्रगत अवस्थेतील मानवी संस्कृतीला स्त्रीमुळेच समृद्धी लाभली; भांडी घडवणे, त्यावर नक्षी काढणे, भाषानिर्मिती, अपत्यांना भाषा शिकवणे, विणकाम, वस्त्रनिर्मिती, समाज धारणा आणि धर्म या सर्वामध्ये स्त्रीचा सिंहाचा वाटा आढळतो. धान्य पेरण्याचा, शेतीचा शोध स्त्रीच्या निरीक्षणशक्तीमुळेच लागला. पितृत्वाचे कोडे उलगडलेले नव्हते. त्या काळात स्त्री मानवाचा वंश वाढवीत, जोपासत होती.

कृषिसंस्कृतीच्या उत्तर काळात मानव नद्यांच्या खोऱ्यांतून स्थिरावला. शेतीमुळे



शांतता, समृद्धी, उसंत लाभली. अशा वेळी शेतीची कष्टमय, वेळखाऊ जड, कंटाळा वा थकवा आणणारी कामे करण्यासाठी पुरुषांनी स्त्री, गुलाम व नोकरांना वेठीस धरले. पितृसत्ताक कुटुंब पद्धती, मालमत्ता, मालकी हक्क, गुलामगिरी, धर्म जसजसे रेखीव, कडक, काटेकोर होत गेले तसतशी स्त्री मानव न राहता केवळ वस्तू बनली. केवळ चामड्याची पिशवी ठरली. स्त्री व पुरुष यांच्या नीतिमत्तेच्या कल्पनात फरक पडू लागला आणि 'विवाहपूर्व कौमार्यबंधन आणि विवाहोत्तर पतिनिष्ठा' या चार शब्दामध्ये स्त्रीची नीतिमत्ताच नव्हे तर प्रगल्भता, पात्रता, सामर्थ्य, कर्तृत्व, गुणवत्ता कोंडल्या गेल्या आणि स्त्रीने पुरुषप्रधान समाजव्यवस्था ठोकरू नये म्हणून पातिव्रत्य संकल्पनेचा उदो उदो झाला.

लेखिकेने स्त्रीजीवनाचा घेतलेला हा वेध मार्मिक आहे.

डॉ. लीला पाटील भूतकाळ, इतिहास यापेक्षा वर्तमान व भविष्याकडे अधिक लक्ष देतात. या ग्रंथातील लेखांचे वर्गीकरण ६ भागात केले आहे. १) ग्रामीण स्त्री मुक्तीच्या शोधात, २) आजचे स्त्रीजीवन, ३) मिळवती स्त्री, ४) स्त्री–शिक्षण, ५) तरुणीविषयी थोडेसे व ६) स्त्रीमुक्तीविषयी अल्पसे. या प्रकरणातून स्त्री जीवनाच्या सर्वांगीण समस्यांचा उहापोह केला आहे.

विधवा, घटस्फोटिता, परित्यक्ता, प्रौढ कुमारिका, कुमारी माता, बलात्कारिता, वेश्या, देवदासी व समस्याग्रस्त स्त्रियांप्रमाणेच ग्रामीण स्त्री, मिळवती स्त्री, ग्रामीण शिक्षित तरुणी, ग्रामीण शिक्षित विवाहोत्सुक तरुणी व मुक्तीचा ध्यास घेतलेली तरुणी इत्यादीविषयी लेखिकेने संशोधनाधारे मांडलेली मते विचाराला चालना देतात.

या सर्व विवेचनाला स्त्री जीवनाच्या निरनिराळ्या अंगासंबंधी केलेल्या पाहण्यांच्या निष्कर्षांचा सबळ आधार असल्याने आजच्या भारतीय स्त्रीच्या मानसिकतेवर मर्मभेदक प्रकाशझोत पडतो.

***भारतीय स्त्री जीवन, पृष्ठे २००, शंभर रुपये***


## पालकांसाठी खुषखबर!

*खास मुलांसाठी आम्ही **एक आकर्षक सवलत योजना** जाहीर करीत आहोत. आपण ऑगस्ट महिन्यापासून १० महिने दरमहा २० रु. पाठवा. आपल्या मुलांसाठी पुढील मे महिन्यात ३०० रुपयांची आपल्या पसंतीची पुस्तके आम्ही आमच्या खर्चाने पाठवू. त्वरा करा. या योजनेचे सभासद व्हा व मुलांसाठी मे महिन्यात छान छान भरपूर पुस्तके घरपोच मिळवा.*

*आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथजगत,** १२१६, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.*

## मेहता मराठी ग्रंथजगत वर्गणीचे नूतनीकरण करा!

*वाचकमित्रहो,*

मराठी ग्रंथविश्वाची अद्ययावत माहिती देणाऱ्या मराठी ग्रंथजगतचे आपण वर्गणीदार आहात याचा आम्हाला अभिमान वाटतो.

आपला वार्षिक नूतनीकरण करण्याचा व्याप वाचावा म्हणून आम्ही सवलतीची योजना जाहीर करीत आहोत.

**एक वर्षांची वर्गणी ८०रुपये तीन वर्षांची वर्गणी २००रुपये बचत ४०रुपये**

**पाच वर्षांची वर्गणी ३००रुपये बचत १००रुपये**

पाच वर्षांची वर्गणी एकदम पाठवल्यास आपणांस सर्वांत जास्त लाभ होईल. पुढे वर्गणी वाढली तरी आपल्याला याच वर्गणीत अंक नियमित मिळत राहतील.

*वर्गणी पाठवण्याचा पत्ता :*

**मेहता मराठी ग्रंथजगत**, १२१६, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०.

स.न.वि.वि.

मला ग्रंथजगतचे १/३/५ वर्षांसाठी वर्गणीदार व्हायचे आहे. सोबत ८०/२००/३००रु.चा ड्राफ्ट/मनीऑर्डर पाठवत आहे.

माझे नाव ____________________

पत्ता ____________________

____________________


गाव/शहर ____________ पिनकोड नंबर ____________

माझ्या पुढील मित्रांनाही हे मासिक १/३/५वर्षे भेट म्हणून माझ्यातर्फे पाठवावे. त्यांचीही वर्गणीही सोबत जोडत आहे.

१) नाव ____________________
पत्ता ____________________
____________________
गाव/शहर ____________ पिनकोड नं. ____________

२) नाव ____________________
पत्ता ____________________
____________________
गाव/शहर ____________ पिनकोड नं. ____________

कथासंग्रह




**मायामृग**

*अनु.:* **उमा कुलकर्णी**

आधुनिक भारतीय खेडं,
तेथील माणूस व त्याचे जगणं -
'तेजस्वीं'च्या लखलखीत भाषेत!

*मूल्य :* **शंभर रुपये**

बागकाम विषयक




**बोन्साय**

**आ. बा. पाटील**

या पुस्तकाच्या आधारे आपण
विविध शैलीची झाडे आणून
घरातच निसर्ग निर्माण करू शकतो.

*मूल्य :* **पंच्याहत्तर रुपये**

कादंबरी





**मूल**

**संजोग वीरकर**

अनेक प्रयत्नांनंतर झालेल्या
अपत्याच्या क्लेशकारक मृत्यूचा
हृदयद्रावक अनुभव!

*मूल्य :* **नव्वद रुपये**

प्रवास वर्णन




**हिमकोंदणातील हिरा**

**सूर्यकांत कुलकर्णी**

गिर्यारोहणातील रोमहर्षक
अनुभवांचे तात्विक चिंतनासह
केलेले रसाळ वर्णन

*मूल्य :* **ऐंशी रुपये**


नोव्हेंबर १९९८


# मेहता मराठी ग्रंथजगत


◆ वर्ष दुसरे
◆ अंक अकरावा


## अनुक्रम


संपादकीय ---------------- २

नोबेल पुरस्कारप्राप्त जोझ सरमागो ---------------- ४

साहित्यवार्ता ---------------- ७

इंग्रजीतील बेस्टसेलर कादंबऱ्या ---------------- १३

पुस्तक परिचय ---------------- १४



**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे**
फोन : ४७६९२४

❏ कार्यकारी संपादक
शंकर सारडा

❏ संपादन सहाय्य
सुनीता दांडेकर

❏ मांडणी
मेहता पब्लिशिंग हाऊस

❏ अंकाची किंमत ५ रु.
वार्षिक वर्गणी ५० रु.

❏ वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी.

❏ दरमहा १५ तारखेस हे मासिक प्रसिद्ध होईल.

*संपादक-मुद्रक-प्रकाशक :* **सुनील मेहता,** मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव, पुणे - ३०.

*अक्षरजुळणी :* **मेहता पब्लिशिंग हाऊस,** १२१६, सदाशिव, पुणे - ३०. फॅक्स : २१२-४७५४६२


*या अंकातील लेखकांची मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

# आमची विज्ञानविषयक वैविध्यपूर्ण पुस्तके

**२०% सवलतीत!**

**विज्ञान - छंद आणि प्रयोग**

| | | |
|---|---|---|
| वैज्ञानिक खेळणी | डी. एस. इटोकर | ४५रु. |
| छंदातून विज्ञान | डी. एस. इटोकर | ६०रु. |
| हा खेळ बाहुल्यांचा | डी. एस. इटोकर | ५०रु. |
| जिज्ञासेतून विज्ञान | कविता भालेराव | २५रु. |
| विज्ञान गमती | अरूण मांडे | ४०रु. |
| विज्ञान जमती | अरूण मांडे | ४५रु. |
| प्रयोग करुया गमतीचे | अनु. मीना किणीकर | ७०रु. |
| ज्ञानदीप | निरंजन घाटे | ७०रु. |
| विज्ञान विहार | नारायण धारप | ५०रु. |

**स्फूर्तीदायक चरित्रे व विज्ञानकथा**

| | | |
|---|---|---|
| असे शास्त्रज्ञ असे संशोधन | निरंजन घाटे | ५०रु. |
| यंत्रलेखक | निरंजन घाटे | ११०रु. |
| एकविसावं शतक | निरंजन घाटे | १५०रु. |
| अज्ञात अनामिकांचे कर्तृत्व | अनु. वैशाली जोशी | ५०रु. |
| संशोधकांच्या यशोगाथा | शांता पेंडसे | ५०रु. |
| अखेरचा प्रयोग | डॉ. बाळ फोंडके | ९०रु. |

**जैविक विज्ञान**

| | | |
|---|---|---|
| संप्रेरकाची सुसंगती | अनु. मीना किणीकर | ५०रु. |
| वनस्पती जीवाश्म | अनु. मीना किणीकर | ४०रु. |
| किमया जनुकांची | अनु. वैशाली जोशी | ७०रु. |
| जनुक मोहिम | अनु. वैशाली जोशी | ६०रु. |
| परिक्षानळीतील जंगले | अनु. प्रमोद जोगळेकर | ४५रु. |
| जनुक शक्ती | अनु. प्रमोद जोगळेकर | ६०रु. |
| हिरवे जनुक | अनु. प्रमोद जोगळेकर | ६०रु. |
| पेशीबद्ध जीवन : एक निरंतर प्रवास | अनु. कविता भालेराव | ५०रु. |

**पोस्टेजसह होणाऱ्या रकमेचा ड्राफ्ट/मनीऑर्डर पाठवा. पुस्तके त्वरित पाठवू.**

***T Book Club*** **चे सभासद व्हा व अनुवादीत पुस्तके निम्म्या किंमतीत मिळवा.**
**मेहता मराठी ग्रंथ जगत चे सभासद व्हा आणि 'देशोदेशीची पाककला' हे पुस्तक मोफत मिळवा.**
**ही योजना फक्त डिसेंबर ९८पर्यंतच आहे. वर्गणीसह रु. ६५/- M.O. ने त्वरित पाठवा.**

*अधिक माहितीसाठी लिहा :*

**मेहता पब्लिशिंग हाऊस,** १२१६, सदाशिव पेठ, पुणे. ✆ ४७६९२४
**मेहता बुक सेलर्स,** भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर. ✆ ५२२३०४

## T Book Club
### ग्रंथप्रेमींसाठी आकर्षक योजना

या बुक क्लबचे सभासद २० रुपये भरून होता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासद झाल्यास ही पुस्तके आपण निम्म्या किंमतीत मिळवू शकता. जसजशी पुस्तके प्रकाशित होतील, तसतशी आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाईल. आपण ही सर्व सहाही पुस्तके घ्यावयाची आहेत.

*T **बुक क्लब-८** मधील दुसरे पुस्तक उपलब्ध आहे.*

*एबोला :* केवळ एक विषाणू नव्हे तर साक्षात् यमदूत! आफ्रिकेच्या घनदाट जंगलातून बाहेर पडून, अमेरिकेच्या राजधानीत मृत्युचं थैमान घालणाऱ्या *एबोला* विषाणूचा, मानवाच्या अस्तित्वालाच आव्हान देणारा चित्तथरारक प्रवास....

## द हॉट झोन

मूळ लेखक : **रिचर्ड प्रेस्टन**
अनुवाद : **डॉ. प्रमोद जोगळेकर**

■ मूळ किंमत **रु. २००.००** ■ सभासदांना **रु. १००.००**

सभासद फी २०रु. व पोस्टेज १५रु. मिळून एकुण १४५रु. मनीऑर्डरने पाठवावे अथवा पुस्तक समक्ष येवून घेऊन जावे.

### आतापर्यंतच्या बुक क्लब मधील उपलब्ध पुस्तके

| पुस्तकाचे नाव | मूळ लेखक | अनुवाद |
|---|---|---|
| मध्यस्थ | फ्रेडरिक फोरसीथ | लीना सोहोनी |
| वाईल्ड कार्ड | रेमंड हॉकी/ रॉजर बिंग हॅम | अरुण मांडे |
| लव्ह स्टोरी | एरिक सेगल | अनिल इनामदार |
| सिटाडेल | ए. जि. क्रोनिन | मंगला निगुडकर |
| नो कम बॅक्स | फ्रेडरिक फोरसीथ | विजय देवधर |
| हे बंध वात्सल्याचे | हेरॉल्ड रॉबिन्स | योगिनी वेंगुर्लेकर |
| तू असा जवळी रहा | हेरॉल्ड रॉबिन्स | पद्मा अभ्यंकर |
| मुखवटे | ॲगाथा ख्रिस्ती | शर्मिला गाडगीळ |
| पाषाण | ॲगाथा ख्रिस्ती | शर्मिला गाडगीळ |
| नाईट | इली वायझेल | आशा कर्दळे |
| द मिरर क्रॅकड | ॲगाथा ख्रिस्ती | श्रीनिवास गुळवणी |
| हंट द मॅन डाऊन | विल्यम ह्यूमन | अरुण डावखरे |
| ट्रिनिटीज चाईल्ड | विल्यम प्राक्नो | अनिल काळे |
| साक्षी | सरला बार्नबस | स. वा. मुळे |
| सिटी ऑफ जॉय | डॉमिनिक लॅपिए | अनिल कुलकर्णी |
| नॉट विदाऊट माय डॉटर | बेट्टी महमूदी | लीना सोहोनी |
| द टर्मिनल मॅन | मायकेल क्रिश्टन | अरुण मांडे |



# पुरस्कार

### डॉ. प्र. न. जोशी - कानडे पुरस्कार

संत साहित्याचे अभ्यासक डॉ. प्र. न. जोशी यांना दहा हजार रुपयांचा डॉ. मु. श्री. रानडे पुरस्कार देण्यात येणार आहे, अशी माहिती पुरस्कार समितीचे अध्यक्ष प्रा. रा. श. नगरकर यांनी दिली.

### पुणे मराठी ग्रंथालयातर्फे वर्धापनदिनानिमित्त पुरस्कार

पुणे मराठी ग्रंथालयातर्फे वर्धापनदिनानिमित्त दि. ५ ऑक्टोबर १९९८ रोजी ज्येष्ठ विनोदी कथाकार द. मा. मिरासदार, व. पु. काळे, मंगला गोडबोले आणि डॉ. कृ. पं. देशपांडे या चौघांना एकेक हजाराचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. बुलडाणा येथील ग्रंथपाल भास्करराव देशपांडे यांचाही ग्रंथालयीन कार्यकर्ते म्हणून गौरव करण्यात आला.

### फुले - आंबेडकर पुरस्कार

महात्मा फुले - डॉ. आंबेडकर यांच्या जीवनकार्यावरील वैचारिक पुस्तकाला पुरस्कार देण्यात येणार आहे. ते १४ एप्रिल ९६ ते १४ एप्रिल ९८ या दरम्यान प्रसिद्ध झालेले असावे. पत्ता : डॉ. डी. एस. गायकवाड, ए-५ शिक्षक निवास, पुणे विद्यापीठ, पुणे - ४११००७.

### साहित्यसंघाचे पुरस्कार

मुंबई मराठी साहित्य संघातर्फे यंदा देण्यात येणाऱ्या वाङ्मयीन पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. ज्येष्ठ साहित्यिक पुरस्कार गंगाधर गाडगीळ यांना देण्यात येणार आहे. समाजवादी विचारवंत पुरस्कारासाठी कुमार केतकर (संपादक, महाराष्ट्र टाइम्स) यांची निवड झाली आहे. ज्येष्ठ समीक्षक पुरस्कार (डॉ. म. सु. पाटील), साहित्य सेवा पुरस्कार (रवीन्द्र पिंगे) आणि लेखिका पुरस्कार (मोहिनी वर्दे). हेही जाहीर करण्यात आले.